REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ एप्रिल, १९४४ अंक १४

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

विनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर ★ हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

>। दत्त कंपनी ।<
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळवर रिपेअर करून मिळतील.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

पुना गेस्ट हाउस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### दोन मोठ्या रेल्वेज सरकार मालकीच्या झाल्या

मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे व साउथ इंडियन रेल्वे ह्या दोन रेल्वेज १ एप्रिल रोजीं सरकारच्या मालकीच्या झाल्या. त्या दोन्ही रेल्वेजची एकूण लांबी ५,२८८ मैल आहे.

### कामगारांच्या मुलांसाठी दूध

गिरणी कामगारांच्या तीन ते पांच वर्षांच्या अशक्त मुलांस पिण्यासाठी दूध देण्याची मुंबई शहरांतील योजना तीन महिने चालू आहे. आतापर्यंत दर आठवड्यास सरासरीनें ८० शेर ह्याप्रमाणें ७२१ शेर दूध आजवर वाटून झालें. प्रत्येक मुलास दररोज पावशेर दूध मिळतें.

### चीनच्या पुनर्घटनेसाठी पेट्रोल व बूट

युद्धसमाप्तीनंतर, पेट्रोल व बूट पुरवून चीनच्या पुनर्घटनेस मदत करण्याची मेक्सिकोची तयारी आहे, असें मेक्सिकोच्या चीनमधील वकिलानें नुकतेंच सांगितलें.

### रशिया-जपान व्यापारी करार

रशिया व जपान यांचेमध्यें एक व्यापारी करार झाला आहे.

### महागाई भत्त्यांत वाढ

मुंबई प्रांतिक सरकारनें आपल्या नोकरांच्या महागाई भत्त्यांत वाढ जाहीर केली आहे. सध्या १५० रुपयांवरील मुंबई शहर, अहमदाबाद व मुंबई उपनगर येथील पगारदारास भत्ता मिळत नाहीं; पगाराची नवी मर्यादा २५० रुपये आहे. ४० रुपयांखालील पगारास सध्या ११ रुपये भत्ता मिळतो, तो ह्यापुढें १४ रुपये मिळेल. त्यावरील पगारदारास मिळणाऱ्या १४ रुपयांऐवजीं आतां १८ रुपये मिळतील. इतर ठिकाणच्या २०० रुपयांखालील ४० रुपये पर्यंतच्या पगारास ११ रुपये व त्यापुढील पगारास १४ रुपये भत्ता मिळेल. पूर्वीची भत्त्यास पात्र असलेल्या पगाराची कमाल मर्यादा १२० रुपये होती व भत्ता अनुक्रमें ८ रुपये व १० रुपये होता.

### सहकारी सोसायट्या व स्टोर्ससाठी शिक्षण वर्ग

अहमदाबाद शहरांत रेशनिंगसाठी किरकोळ विक्रेते म्हणून १५८ सहकारी स्टोर्सना व सोसायट्यांना मान्यता देण्यांत आली आहे. त्यांत कामें करणारांना योग्य तें मार्गदर्शन करण्याचे उद्देशानें मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या अहमदाबाद जिल्हा शिक्षण समितीनें एक वर्ग चालवून त्यांत सोसायट्यांची व्यवस्था व हिशेब ठेवण्याचें शिक्षण दिलें.

### जर्मनीवरील बाँबवर्षाव

जर्मनी, इटली व जर्मनव्याप्त युरोप ह्यांवर १ मे, १९४० ते ३१ डिसेंबर, १९४३ ह्या मुदतींत एकूण २,४६,४२९ टन वजनाचे बाँब टाकण्यांत आले, त्यांपैकीं २,०३,००० टन वजनाचे बाँब एकट्या जर्मनीच्या वाट्यास आले.

### प्रो. हिल यांच्या भेटीची फलश्रुति

ब्रिटिश शास्त्रज्ञ, प्रो. ए. व्ही. हिल, ह्यांनीं हिंदुस्थानास नुकतीच भेट दिली, त्याचा खर्च १७ हजार रुपये आला. स्वगृहीं पोचल्यानंतर प्रो. हिल हे सूचनात्मक रिपोर्ट लिहिणार आहेत.

### "व्हेलॉन"

पेट्रोलियम व समुद्राचें पाणी ह्यांपासून "व्हेलॉन" करण्यास प्रारंभ झाला आहे. त्याचें सध्या मच्छरदाणीचें कापड बनविण्यांत येत आहे; परंतु पायमोजे, हँडबॅग्ज, हॅट, बूट, इत्यादिहि त्यापासून होऊं शकतील. त्यावर डाग पडत नाहीं, तें फाटत नाहीं व विरतहि नाहीं. कपास व लोकर ह्यांच्या धाग्याबरोबर तें विणतां येतें. जळत्या मेणबत्तीवर धरलें, तर तें वितळतें परंतु जळत नाहीं.

### अमेरिकन मालाची प्रचंड आयात

अमेरिकेनें हिंदुस्थानास लंड उसनवार पद्धतीनें ११ मार्च, १९४१ ते ३१ डिसेंबर, १९४३ ह्या मुदतींत ८१ कोटि, ९४ लक्ष डॉलर्स किंमतीचा माल दिला. अमेरिकेची ही निर्गत १९४१ व १९४२ मिळून झालेल्या निर्गतीपेक्षा ७०% अधिक आहे. युद्धसाहित्य, शेतीचीं अवजारें, रेल्वे इंजिनें, वाफिणी, रस्ते व विमानतळ करण्यास लागणारी यंत्रसामुग्री, मशीनटूल्स, पोलाद, तांबें, अल्युमिनियम, इत्यादींचा समावेश त्यांत झालेला आहे. हिंदुस्थानानें अमेरिकेकडे ताग, अभ्रक, मँगेनीज, शेलॅक, इत्यादि माल पाठविला. ह्या मालाचें उत्पादन वाढण्यास सहाय करणारी यंत्रसामुग्री तयार करून अमेरिकेनें हिंदुस्थानांत धाडली.

### घटस्फोटांची वाढती संख्या

ग्रेट ब्रिटनमध्यें ४० वर्षांपूर्वी दरसाल ७५० घटस्फोट होत असत. गेल्या महायुद्धाचे काळांत त्यांची वार्षिक सरासरी ३ ते ४ हजार झाली, व आताची वार्षिक सरासरी १२ हजार आहे! हें वाढतें काम आवरण्यासाठी घटस्फोटाचे दावे चालविणाऱ्या न्यायाधीशांची संख्या वाढविणें अपरिहार्य झालें आहे.

### पीक सुधारण्यासाठी ९० लक्ष रुपयांची योजना

तांदळाचें सुधारलेलें बीं व खत ह्यांचा प्रसार करण्यासाठी मद्रास सरकारनें ९० लक्ष रुपयांची योजना केली आहे. ह्यापैकी निम्मी रक्कम हिंदुस्थान सरकार बिनव्याजी कर्जाऊ देणार आहे. बी व खतें विकत घेण्याकडे ९० लक्ष रुपयांचा विनियोग करून शेतकऱ्यांस मूळ किंमतीस तीं दिलीं जातील.

### पू. खानदेश जिल्ह्यांत जरिला कपाशीची सक्ती

पूर्व खानदेशांत कपास पेरणारांनीं जरिला जातीचीच कपास लावली पाहिजे, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

### शास्त्रज्ञांस निमंत्रण

ग्रेट ब्रिटनमधील शास्त्रीय व औद्योगिक संशोधन संस्थांस भेट देण्याचें निमंत्रण सात प्रमुख हिंदी शास्त्रज्ञांस आलें आहे.

### फिनॅन्स बिलास कायदेशीरपणा प्राप्त झाला

मध्यवर्ती सरकारच्या फिनॅन्स बिलास गव्हर्नर जनरलनें ३१ मार्च रोजीं मान्यता देऊन त्यास कायद्याचें स्वरूप दिलें व हा कायदा १ एप्रिलपासून अंमलांत यावा असें फर्माविलें. रेल्वे दरांतील वाढीसहि असेंब्लीनें बहुमतानें विरोध दर्शविला होता, त्यासंबंधांत सरकारचें धोरण अद्याप जाहीर झालेलें नाहीं. तें जाहीर होईपर्यंत पूर्वीचेच रेल्वे दर चालू रहातील.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १०६ | निर्णायक महत्त्व नाहीं— | |
| २ मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक | १०७ | कृत्रिम वातावरण—धान्याची | |
| ३ वहाणाचें तेल वाम्यावर ! | १०८ | पिकें काढण्याची सक्ती— | |
| ४ शेड्यूल्ड बँकांच्या शाखा | १०८ | सोनें बाजारांतील खळबळ | |
| ५ स्फुट विचार ... | १०९ | ६ ब्रिटिश कापडाचा धंदा | १११ |
| मध्यवर्ती कायदेमंडळांत कर- | | ७ सुरत सें. को. बँक ... | १११ |
| विषयक बिल—बहुमतास | | ८ औंध न्यू. विमा कं. ... | १११ |



# अर्थ

बुधवार, ता. ५ एप्रिल १९४४


## मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

ह्या प्रांतात सध्या कायदेमंडळाचें कार्य स्थगित आहे आणि त्यास जबाबदार असणारें मंत्रिमंडळ अस्तित्वांत नाहीं; राज्यकारभाराची सर्व जबाबदारी घटना कायद्यास अनुसरून गव्हर्नरांनीं उचलली आहे आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या सहाय्यानें ते ती पार पाडीत आहेत. ह्या कारणानें मुंबई प्रांताच्या सरकारचें १९४४-४५ सालाबाबतचें अंदाजपत्रक त्यांनीं पसंत करून गेल्या आठवड्यांत जनतेच्या माहितीसाठी त्यास प्रसिद्धी दिली. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींच्या पुढें अंदाजपत्रकांतील ठळक बाबी मांडून त्यांचें स्पष्टीकरणहि गव्हर्नरांनीं केलें. वाढतें उत्पन्न, वाढता खर्च आणि त्यामधून पुनर्घटना व आर्थिक अभिवृद्धि ह्यांचेकरितां केलेली मंगाजळ्यांची व खर्चाची तरतूद असें ह्या अंदाजपत्रकाचें मोटक रीतीनें वर्णन करतां येईल. प्रांतिक जमा-खर्चाचे आकडे कसे फुगत आले आहेत ह्याची कल्पना खालील तुलनात्मक आकड्यांवरून येण्यासारखी आहे:—

प्रांतिक जमा-खर्च

( कोटि रुपये )

| | १९४२-४३ | १९४३-४४ | १९४४-४५ |
|---|---|---|---|
| | पक्के हिशेब | दुरुस्त अंदाज | अंदाज |
| जमा | १९.७ | २३.८ | २४.८ |
| खर्च | १७.७ | २२.२ | २४.८ |
| शिलक | १.९ | १.६ | ८९ हजार |

सरकारचें उत्पन्न सारखें वाढत जाऊन मोठमोठ्या शिलका त्याच्यापाशी उरतात, तर करांचें प्रमाण कमी कां करीत नाहीं असा प्रश्न सहजच सुचतो. चलनवृद्धीमुळें होणाऱ्या महागाईस आळा घालण्यासाठीं आणि युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी जनतेकडून सरकारी तिजोरीकडे अधिक पैशाचा ओघ वळवणें हा आपल्या अंदाजपत्रकविषयक धोरणाचा हेतु आहे असें उत्तर त्यास गव्हर्नरांनीं आपल्या खुलाशाच्या भाषणांत दिलें आहे. ह्या परिस्थितीची पार्श्वभूमि अशी आहे. १९४३–४४ च्या प्रारंभीं सरकारची सर्वसाधारण शिलक ४ कोटि, ८८ लक्ष रुपये होती, ती वर्षअखेरीस ६ कोटि, ३० लक्ष झाली. आर्थिक व सामाजिक संवर्धनासाठी खास गंगाजळी बनवली जात आहे, तीमध्यें १ कोटि १२ लक्ष रुपये होते, त्यांतून कांहीं खर्च झाला तरी बारा महिन्यांचे शेवटीं २ कोटि ८८ लक्ष रुपये ह्या फंडांत उरले. वर्षाचे अवधींत त्यांत दीड कोटि, रुपयांची भर घालण्यांत आल्यानें ही वाढ झाली. युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी दुसरी गंगाजळी १९४२–४३ मध्यें स्थापन करण्यांत आली. १९४३–४४ च्या प्रारंभीं तीमध्यें १ कोटि, ३९ लक्ष रुपये होते. ह्या रकमेंत वर्षाच्या अवधींत भर घातली गेली आणि ती आतां अडीच कोटि रुपये झाली आहे. विजापूर जिल्ह्यांतील दुष्काळाप्रीत्यर्थ एक कोटि रुपये अपेक्षेच्या पलीकडे खर्चावे लागले तरी मामुली खर्च भागून वरील शिलका व फंड ह्यांचेमध्यें वाढ कशी होऊं शकली ? ह्या प्रश्नाचें असें उत्तर देण्यांत आलें आहे कीं, प्राप्तीवरील कराच्या वसुलीपैकी मुंबई सरकारच्या हिश्शांत वाढ होऊन त्यास सुमारें दीड कोटि रुपये मिळाले, एक्साइज वस्तूंचें उत्पन्न दीड कोटि रुपयांनीं वाढलें आणि अलीकडे करवाढ करण्यांत आली आहे तिनें उत्पन्नांत थोडी भर घातली.

करांच्या मार्गानें मामुली गरजेच्या मानानें अधिक उत्पन्न सरकारी तिजोरींत येत आहे ही मोह गव्हर्नरांच्या भाषणांत मान्य करण्यांत आली आहे, पण तिचें त्यांनीं समर्थनहि केलें आहे आणि तें द्विविध आहे. त्यांचा पहिला मुद्दा समाजांत खेळणारें फाजील चलन करांच्या साधनानें सरकारच्या तिजोरींत परत आणण्याच्या आवश्यकतेविषयींचा आहे. १९४४-४५ च्या अंदाजपत्रकांत करवाढ नाहीं, पण प्रांतिक तिजोरीच्या सुस्थितीच्या दृष्टीनें करांत कपातहि नाहीं. ह्याचें एक कारण वरील मुद्यांत समाविष्ट झालें आहे. युद्धोत्तर काळांतील पुनर्घटना आणि आर्थिक अभिवृद्धीचीं चालू कामें ह्यांसाठी मोठमोठ्या रकमा आवश्यक आहेत आणि त्यांची तरतूद व्हावी म्हणून सरकारचें उत्पन्न मोठें असलें पाहिजे आणि त्यांतून शिलका बाजूस काढून ठेवतां आल्या पाहिजेत हा अंदाजपत्रकाच्या समर्थनांतला दुसरा महत्त्वाचा मुद्दा पुढें मांडण्यांत आला आहे. १९४३-४४ सालांत बेटिंग, करमणूकी व स्टँप्स ह्यांच्यासंबंधांतील करांत वाढ करण्यांत आली आणि तिचें बारा महिन्यांतलें उत्पन्न १ कोटि, २० लक्ष रुपये होईल, १९४४-४५ सालीं हे कर तसेच कायम राहणार आहेत. शहरांतील स्थावर मिळकतीवर कर अगदीं अल्प प्रमाणांत कमी करण्यांत येणार आहे. त्यायोगें तूट येईल ती सरकारी उत्पन्नाच्या वाढीनें भरून निघेल. हिंदुस्थान सरकारचें कर्ज फेडण्यासाठीं प्रांतिक सरकारनें १९४३-४४ मध्यें साडेतीन कोटि रुपयांचें कर्ज उभारलें, त्यामुळें व्याजांत बचत झाली आणि चलनवृद्धीस पायबंद बसला. धान्याच्या किंमतींचें व वाटणीचें नियंत्रण करण्यासाठीं सरकारास त्याच्या खरेदींत पैसा गुंतवावा लागला आहे आणि त्याची रकम दहा कोटि रुपये झाली आहे. सरकारच्या शिलकांतून हा मांडवली स्वरूपाचा खर्च करण्यांत आला आहे.

---

## पळ्याचें तेल वांग्यावर !

### विमा कंपन्यांच्या आजच्या परिस्थितीस जबाबदार कोण ?

( ले:—श्री. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी )

असोसिएटला यापुढें ॲक्चुअरी म्हणून काम करण्यास सध्या प्रमाणें परवानगी न देतां, प्रत्येक विशिष्ट कामासाठीं, सरकारी खात्यानें योग्य वाटल्यास तेवढ्यापुरती परवानगी यावी, अशा अर्थाची विमा कायद्याखालील नियमांत दुरुस्ती करण्याचा विचार आहे. ह्या नियमाची अनिष्टता "अर्था" च्या ता. ८ मार्चच्या अंकांत तपशीलवार स्पष्ट करून सांगितलेलीच आहे. हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या गेल्या कांहीं वर्षांतील बिघडलेल्या परिस्थितीचा व नियमदुरुस्तीचा संबंध दिसतो. आयुर्विमा कंपन्यांच्या मूल्यमापनासंबंधीं आपल्या विमावार्षिकांत चार–दोन पॅरिग्राफ लिहिण्यापलिकडे सरकारनें आजवर काय केलें ? ॲक्चुअरीचें काम करणारे फेलोज व असोसिएटस ह्यांच्याशीं विमा कंपन्यांची परिस्थिति व ते सुधारण्याचा मार्ग ह्याविषयीं चर्चा करण्याचा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें आजवर कधींतरी प्रयत्न केला आहे काय ? विमा कंपन्यांच्या सल्लागार समितीशीं त्यानें मधून मधून चर्चा केली हें खरें आहे, परंतु कंपन्यांच्या व्यवस्थापकांपेक्षा विमा शास्त्रांतील तज्ज्ञ व अनुभवी अशा ॲक्चुअरींचा सल्ला घेणें अधिक जरूर नव्हतें काय ?

...हिंदी आयुर्विमा कंपन्यांची प्रगति इष्ट मार्गानें होत नसेल, तर त्याचा दोष मुख्यतः कंपन्यांच्या चालकांकडे जातो; ॲक्चुअरीवर त्याचें खापर फोडणें अयोग्य आहे. माझ्या तीस वर्षांच्या अनुभवांत, विम्याची चांगली माहिती असलेले पंधरा वीस सुद्धां उत्तम कर्तबगार कंपनी व्यवस्थापक माझ्या आढळांत आले नाहींत. व्यवस्थापकाच्या कामाचें तंत्र माहीत असलें, तरी बहुतेकांत जबाबदारीच्या जाणीवेचा अभाव होता, त्याचा परिणाम गळेकापू स्पर्धेमध्यें झाला. समक्ष भेटींत मी त्यांना शक्य तेवढा सल्ला व सूचना देत असे; परंतु त्याचा तात्काळ विसर पडे; विम्याच्या धंद्यांत, पडणारी किंमत व नफ्याचें प्रमाण, हीं अवश्य हिशेबांत घ्यावीं लागतात, परंतु कंपन्यांच्या डायरेक्टरांना त्याचा पत्ताहि नसल्याचें कित्येक प्रसंगीं आढळलें. त्यामुळें, चांगल्या व्यवस्थापकासहि डायरेक्टरांस काटकसरीचें व किफायतशीर गुंतवणुकीचें महत्त्व पटवून देणें अवघड जाई. पैसे गुंतविण्याचे कामीं एका टोकास भरमसाटपणा तर दुसऱ्या टोकास भलतीच सावधगिरी असल्याचेंहि दृश्य मूल्यमापनाचे वेळीं दृष्टीस पडे, विमाकंपन्यांचे चालकांस कांहीं किमान लायकी ( उ. चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ लंडनचें असोसिएट अथवा फेलो ) कायद्यानें निश्चित करण्याची वेळ आली आहे, असें माझें ठाम आहे. इंग्लंडमध्यें असा कायदा नसला, तरी हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत तशा प्रकारची तरतूद आवश्यक आहे. अर्थात्, ही सक्ती तात्काळ अमलांत आणणें योग्य होणार नाहीं व अनुभवी आणि लायक व्यवस्थापकांचे बाबतींत अपवाद करणें योग्य होईल. अशा प्रकारच्या व्यवस्थापकांचें नेतृत्वाखालीं चाललेल्या कंपन्यांच्या डायरेक्टरांचे कांहीं अधिकार कमी केले तर तें हिताचेंच होईल. परंतु वर सांगितलेली विमा कंपन्यांच्या आजच्या परिस्थितीचीं मूळ कारणें दूर करण्याचा प्रयत्न न करतां असोसिएटसवर घसरून त्यांच्या धंद्यास दूषण देण्याचा प्रयत्न करणें हें अगदीं अयोग्य आहे.

## शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत दररोज एका शाखेची भर

हिंदी बँकांची संख्या गेल्या दोन वर्षांत बरीच वाढली आहे व त्यांच्या शाखांच्या संख्येंत तर अजूनहि एकसारखी भर पडत आहे. ३१-१२-४१ अखेर एक्सचेंज बँका वगळून एकूण ४५ शेड्यूल्ड बँका होत्या, त्यांची संख्या १९४२ अखेर ४७ झाली व १९४३ अखेर ती ६० इतकी आहे. सर्व शेड्यूल्ड बँकांच्या शाखा मोजल्या, तर त्या १९४० अखेर १३५१ होत्या. १९४२ अखेर त्यांची संख्या १४५३ च होती. म्हणजे दोन वर्षांत १०२ शाखा वाढल्या. परंतु १९४३ च्या पहिल्या तिमाहीचे अखेर शाखांची संख्या १५१२ झाली; दुसऱ्या सहामाहीचे अखेर ती १६०७ वर गेली व ३०-९-४३ अखेर ती १७२५ भरली. म्हणजे १९४३ च्या पहिल्या नऊ महिन्यांच्या २७३ दिवसांत बँकांच्या शाखांत २७२ शाखांची भर पडली. दरमहा ३० नव्या शाखा, असा हा हिशेब होतो व हिंदुस्थानांत शेड्यूल्ड बँकांपैकी कोणत्या तरी एका बँकेची दररोज एक नवीन शाखा कोठेंतरी उघडण्यांत येत आहे, असा त्याचा अर्थ आहे. शाखावाढीची प्रवृत्ति वाढत आहे. बँकिंगचा प्रसार वाढण्याची इष्टता निर्विवाद आहे, परंतु झपाट्यानें काढण्यांत येणाऱ्या शाखा पुढेंहि चांगल्या चालू राहिल्या, तरच त्यांचा खरा उपयोग आहे. बँकिंगच्या धंद्याची खरी कसोटी युद्धसमाप्तीनंतरच आहे. शाखांची संख्यावाढ व त्यांची प्रगति ह्या संबंधांत सर्वच बँकांस सारखें यश येईल असें नाहीं. नव्या बँकांच्या स्थापनेवर सरकारनें निर्बंध घातले, तसे त्यांच्या शाखांचे संख्येवरहि निर्बंध घालण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं काय ? बँकेचें भांडवल व तिच्याकडील ठेवी ह्यांचे तिच्या शाखांशीं कांहीं प्रमाण असणें आवश्यक नाहीं काय ? इंपीरिअल बँकेच्या शाखांची संख्या १९४० अखेर ३९० होती. ३०–९–४३ अखेर ती ३९३ आहे. प्रमुख पांच हिंदी जॉइंट स्टॉक बँकांनीं ह्याच मुदतींत आपल्या शाखांत १२७ ची भर घातली त्यांपैकीं ७२ शाखा १९४३ च्या पहिल्या नऊमाहींत स्थापन झालेल्या आहेत. एक्सचेंज बँकांच्या शाखांची संख्या १९४० अखेर १०३ होती ती १९४३ अखेर ८५ वर आली व ३०–९–४३ अखेरहि तीच संख्या कायम आहे. इतर शेड्यूल्ड बँकांनीं १९४१ व १९४२ मध्यें ६३ शाखा वाढविल्या व १९४३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत मात्र १९९ शाखांची भर घातली त्यांपैकीं तब्बल १०० शाखा १९४३ च्या तिसऱ्या सहामाहींत निघालेल्या आहेत. शाखावाढीची प्रवृत्ति अद्याप कायम आहे, हें वरील आकड्यांवरून दिसून येईल.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा : पुणें कॅन्टोन्मेंट, बारामती
पे–ऑफिस : खोपोली

—: खेळतें भांडवल रु. १९ लाखांचे वर :—

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५–३-४४ रोजीं गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर बँकेची शाखा लोणावळा येथें उघडण्यांत आली.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजिंग डायरेक्टर्स

# स्फुट विचार

## मध्यवर्ती कायदेमंडळांत करविषयक बिल

ब्रिटिश मंत्रिमंडळाचा शिक्षणविषयक बिलाच्या एका कलमा-वर कॉमन्स सभेंत पराभव झाला आणि स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षक ह्यांचें वेतन सारखें असावें अशी सूचना त्याच्या धोरणा-विरुद्ध मान्य झाली. जबाबदार मंत्रिमंडळाचा पराभव होणें हें कायदेमंडळांतील बहुसंख्य सभासदांच्या त्यावरील अविश्वासाचें स्पष्ट लक्षण समजलें जातें आणि आपल्या जबाबदारीच्या जागांचा त्याग करणें आपलें कर्तव्य आहे असें त्यांनीं समजण्याचा प्रघात आहे. परवाचा ब्रिटिश मंत्रिमंडळाचा पराभव हा त्यावरील अवि-श्वासाचा द्योतक नसून मि. चर्चिल ह्यांस कॉमन्स सभेचा पूर्ण पाठिंबा आहे, असें आश्वासन देण्यांत आलें तरी मुख्यप्रधानांनीं आपणांवरील विश्वास प्रत्यक्ष कृतीनें सभेनें व्यक्त करून दाख-वावा असा आग्रह धरला आणि त्याप्रमाणें मंत्रिमंडळाच्या बिलां-तील मूळ कलम पुन्हां त्यांत दाखल करण्याची सूचना प्रचंड बहुमतानें मंजूर केली. ब्रिटिश लोकशाहीची राज्यपद्धति आणि हिंदुस्थानांतील राज्यघटना ह्यांचेमध्यें कसें जमीन-अस्मानाचें अंतर आहे ह्याची स्पष्ट कल्पना त्याच सुमारास हिंदी मध्यवर्ती असेंब्लींत कार्यकारी मंडळाचें फिनॅन्स बिल बहुमतानें फेटाळून दिलें गेलें तरी ह्या पराभवाचा कांहींच परिणाम झाला नाहीं ह्या गोष्टीवरून येते. असेंब्लींतील लोकनियुक्त सभासदांच्या बहुमतानें हिंदुस्थान सरकारचें एखादें बिल किंवा सूचना नापास केली असत। राज्यघटनेच्या कायद्यास अनुसरून गव्हर्नर जनरलला सदरहु बिल किंवा सूचना अगत्याची आहे, ह्या मुद्यावर स्वतःच्या अधि-कारांत ती कायदेशीर आहे असें जाहीर करतां येतें.

## बहुमतास निर्णायक महत्त्व नाहीं

करांबाबतच्या सरकारच्या योजना एकत्र करून त्यांचें बिल सर जरेमी राइस्मन ह्यांनीं असेंब्लीपुढें मान्यतेसाठी मांडलें असतां दोन वेळां त्याचा विचार करण्यास बहुमतानें नकार दिला. अशा स्थितींत मध्यवर्ती मंत्रिमंडळास स्थानत्याग करण्याची आवश्यकता भासली नाहीं आणि विरुद्ध पक्षाच्या बहुमताचा त्याचेवर किंवा त्याच्या धोरणावर कोणताच परिणाम झाला नाहीं. कायदेमंडळां-तील लोकनियुक्त सभासदांच्या बहुमतास निर्णायक महत्त्व हिंदी घटना कायद्यानें दिलेलें नाहीं हें ह्याचें कारण आहे. सरकारच्या करविषयक बिलास आपण विरोध करीत आहों तो विरोध युद्ध-प्रयत्नास नाहीं आणि त्याचा रोख केवळ सध्याचें मंत्रिमंडळ लोकमताचें प्रतीक नाहीं हें स्पष्टपणानें दर्शवण्याकडे आहे असें असेंब्लीच्या कित्येक सभासदांनीं बोलून दाखवलें आणि लोक-मतास मान्य असलेलें निराळें मंत्रिमंडळ स्थापन केलें जावें असें सुचवलें. कौंसिल ऑफ स्टेटमध्यें सरकारच्या बाजूचें बहुमत असल्यानें तेथें गव्हर्नर जनरलनीं पाठवलेलें व असेंब्लीनें नाकार-लेलें फिनॅन्स बिल मंजूर झालें. अशा रीतीनें त्यास कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

## कृत्रिम वातावरण

हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक आणि करविषयक कायद्याचें बिल ह्यांची मध्यवर्ती असेंब्ली व कौंसिल ऑफ स्टेट ह्यांमध्यें जी चर्चा झाली तीमध्यें अथपासून इतिपर्यंत कृत्रिमपणा भरला होता. सरकारनें सुचवलेल्या कांहीं खर्चाच्या बाबींस कपातीच्या उप-सूचना असेंब्लींत त्याच्या धोरणासंबंधानें नापसंती व्यक्त करण्या-साठीं पुढें मांडण्यांत आल्या आणि त्या मंजूर झाल्या आणि करविषयक कायद्याचें बिल गव्हर्नर जनरल ह्यांच्या शिफारशीनें आलें असतांनाहि नामंजूर झालें. असेंब्लींतील बहुमताचा विरोध चहा, सुपारी इत्यादि वरील करांस अंशतः असला तरी मुख्यत्वें-करून तो राज्यघटनाविषयक व राजकीय स्वरूपाचा होता. ह्या कारणानें आपल्या करयोजनेच्या टीकाकारांस उत्तर देण्यास सर जरेमी राइस्मन ह्यांस फारसा वावच राहिला नाहीं. जनतेचा पाठिंबा असलेल्या मंत्रिमंडळाच्या स्थापनेची मागणी आणि सध्याच्या कार्यकारी मंडळावरील अविश्वास व्यक्त करण्याचा निश्चय ह्या स्पष्ट उद्देशानेंच प्रेरित होऊन असेंब्लीमधील हिंदी सभासदांच्या गटांनीं एक होऊन फडनविसांचें करविषयक बिल फेटाळलें. लोकपक्षाच्या गटांचें ऐक्य कायम राहून त्यांचे प्रति-निधी आमच्या बाजूच्या जागा घेतील तर आपणांस आनंदच होईल असें सांगण्यापलीकडे अधिक त्यांस कांहीं करतां आलें नाहीं. सरकारच्या प्रस्तुत पराभवाचा योग्य परिणाम होऊन मध्यवर्ती मंत्रिमंडळाची राष्ट्रीय पायावर पुनर्घटना करण्यांत आल्यास युद्धप्रयत्नाच्या दृष्टीनें व देशांतील राजकीय पेचप्रसंग सुटण्याच्या दृष्टीनें ती इष्ट अशीच गोष्ट होईल. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत युद्धकाळांत उत्पन्न होणारे चलनविस्तारा-सारखे प्रश्न समाधानकारकरीतीनें सोडवण्याचा प्रयत्न आपण कसून केला असल्याचें सर जरेमी ह्यांनीं असेंब्लींत टीकाकारांस उत्तर देतांना सांगितलें आणि स्वतःच्या मार्गांतील दुर्लंघ्य अडचणींचा उल्लेख केला. मध्यवर्ती विधिमंडळांत बेजबाबदारी व बेफिकीर-पणा ह्यांचें वातावरण सध्या पसरलें आहे तें जितक्या लवकर दूर होईल तितकें सरकार व जनता ह्यांचे दृष्टीनें आवश्यक आहे.

## हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या सीमेवर लढाऊ हालचाली

ब्रह्मदेशांतील आराकानच्या भागांत हिंदुस्थानांतून गेलेल्या सैन्याची जपानी फौजांशीं लढत चालू असतांच जपाननें मणीपूर संस्थानांत शिरून त्या बाजूनें ह्या देशावर स्वारी केली असल्याचें प्रसिद्ध झालें. ही बातमी सामान्य कल्पनेच्या पलीकडची अस-ल्यानें तिच्या योगानें लोकांस आश्चर्य वाटलें असल्यास त्यांत कांहीं विशेष नाहीं. मध्यवर्ति असेंब्लींत ह्या आश्चर्याचा प्रतिध्वनि उठला आणि सभासदांनीं अधिकृत माहितीविषयीं पृच्छा केली. तिचें समाधान करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानचे सर सेनापती, जन-रल सर क्लॉड ऑकिन्लेक, ह्यांनीं ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवरील परि-स्थिति असेंब्लीस समजावून दिली. हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांच्या सीमेवरील डोंगराळ प्रदेश आणि त्यांतील दळणवळणाच्या विलक्षण अडचणी ह्यांचें चित्र त्यांनीं रेखाटलें आणि जपानी सैन्याच्या तुरळक तुकड्या ह्या देशांत थोडें अंतरपर्यंत आंत शिरल्या असल्या तरी त्या हालचालींस ह्या देशावर जपानची स्वारी असें म्हणणें किती अतिशयोक्तीचें आहे हें त्यांनीं दाखवलें. हिंदुस्थानला जपानच्या स्वारीचें मुळींच भय नाहीं आणि शत्रूची चाल लवकरच थोपवण्यांत येईल, एवढेंच नव्हे, तर सरहद्दीच्या पलीकडे स्वस्थळीं त्यास हाकून दिलें जाईल असें सर सेनापतींनीं आश्वासन दिलें. ह्या देशावर स्वारी करतां येण्यासारखें बळ जपान-जवळ नाहीं आणि इकडे येऊन प्रगति करणें आणि येथील

मुळूख दाबून बसणें त्यास शक्य नाहीं हें स्पष्ट आहे. कांहीं जपानी सैन्य डोंगराळ प्रदेशांतून ह्या देशांत आलें असलें तरी असल्या तुरळक हल्ल्यास विशेष महत्व देण्याचें प्रयोजन नाहीं. सर सेनापतींनीं जबाबदार व अधिकारी वाणीनें आश्वासन दिलें आहे, तें समाधानकारक मानलें पाहिजे.

### धान्याचीं पिकें काढण्याची सक्ती

मुंबई प्रांतांत धान्याचें उत्पादन कमाल मर्यादेपर्यंत व्हावें ह्या हेतूनें येथील सरकारानें विशिष्ट भागांत विशिष्ट पिकें काढण्याची सक्ती शेतकऱ्यास करण्याचा उपक्रम हातीं घेण्याचें ठरवलें आहे, त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. धान्य पुरवठ्याचे बाबतींत हा प्रांत स्वयंपूर्ण नाहीं आणि कित्येक जिल्हे विशेष तुटीचे आहेत; सबंद प्रांतास आणि तुटीच्या जिल्ह्यांस बाहेरून आणलेल्या धान्याचा पुरवठा, प्रयत्न करूनहि, न होण्याचा संभव आहे. अशा स्थितींत प्रांतांत व जिल्ह्यानिहाय शक्य तितकें अधिक धान्य पिकवलें जाण्याची आवश्यकता स्पष्टच आहे. शेतकऱ्यांनीं अधिक धान्य पिकवावें म्हणून गेल्या एक दोन वर्षांत जोराचा प्रचार चालला आहे आणि ह्या कामीं बीं व खत पुरवण्याची व्यवस्थाहि सरकारनें केली आहे. तथापि, कपास व तंबाखू पिकवण्याची वहिवाट कित्येक जिल्ह्यांत आहे तिला मर्यादा घालून त्यांचे ऐवजीं धान्याचीं पिकें काढण्यास शेतकऱ्यांस प्रवृत्त करण्याचें अगत्य सरकारास वाटत आहे. शेतकऱ्याच्या किती जमीनींत ह्या दोन प्रकारांचीं पिकें लावलीं जावीं हें ठरवण्याचा अधिकार स्वतःकडे घेण्याचें त्यानें ह्याकरितां ठरवलें आहे. एकाच जमीनींत तंबाखू किंवा कपास असलें पीक दरवर्षी काढून कांहीं शेतकरी तिची खराबी, करण्याची भीति असल्यानें हा प्रकार घडणार नाहीं अशी सक्ती सरकारास करावी लागेल. असल्या सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी घोटाळ्याची व कित्येक ठिकाणीं जाचक होण्याचा संभव आहे ह्याची जाणीव सरकारास आहे. शेतकऱ्यांचें सबंद पीक ठराविक स्थिर भावानें खरेदी करण्याची आणि त्याच भावानें त्याचा पुरवठा जरूरीचे प्रसंगीं करण्याची व्यवस्था करून त्यांची गैरसोय किंवा नुकसान होणार नाहीं अशी खबरदारी सरकार घेणार आहे. शेतकऱ्यांस प्रस्तुत कायद्याच्या अंमलबजावणींत कांहीं सवलती लागतील त्या देण्याचा सरकारचा विचार आहे. नियोजित कायदा हा एक अभिनव उपक्रम आहे आणि कित्येक जिल्ह्यांत पुरेसें धान्य न पिकवलें गेल्यानें तो हातीं घेणें अगत्याचें झालें आहे असें सरकारचें म्हणणें आहे. कोणत्याहि कायद्याखालील नियम आणि त्यांची योग्य अंमलबजावणी ह्या गोष्टी त्यांच्या हेतुपेक्षा अधिक महत्वाच्या असतात हें येथें विसरून चालणार नाहीं. सबंद जनतेचें हित साधलें जात असतां कोणत्याहि शेतकऱ्यास कायदा जाचक होणार नाहीं ह्या विषयीं दक्षता बाळगली गेली पाहिजे.

### सोनें बाजारांतील खळबळ

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या सोनें बाजारांत खळबळ उडून गेली आणि तिचे परिणाम देशांतील प्रमुख शहरीं प्रत्ययास आले. आज कित्येक महिने रिझर्व्ह बँक इंग्लंड व अमेरिका ह्यांचें सोनें ह्या देशांत विक्रीत आली आहे आणि त्यामुळें ह्या धातूचे बाजारभाव मर्यादेंत व स्थिर राहिले आहेत. जनतेच्या हातांतलें चलन सोन्याच्या मोबदल्यांत बँकेकडे आकर्षून घेणें हा ह्या विक्रीचा हेतू आहे आणि इंग्लंड व अमेरिका ह्या देशांस हिंदुस्थानचे देणें देऊन टाकण्याची चांगली संधीहि ह्या योगानें मिळाली आहे. सोन्यास हिंदुस्थानांत नेहमीच मागणी असते आणि कांहीं वर्षांमागें येथून कोट्यवधि रुपये किंमतीचें सोनें परदेशीं गेल्यानें सदरहू मागणी विशेष तीव्र होणें स्वाभाविक आहे. हातांतला मोकळा पैसा सोन्यांत गुंतविण्याची लोकांची प्रवृत्तिहि युद्धकाळांत बळावते. गेल्या आठवड्यांत सोमवारीं रिझर्व्ह बँकेनें सुमारें पांच लाख तोळे सोनें ७१ रुपयांच्या भावानें विकलें. ही विक्री थांबतांच हा भाव ७२ रुपये ४ आण्यांपर्यंत चढला. दुसरें दिवशीं रिझर्व्ह बँकेनें दोन लक्ष तोळ्यांची ७१ रुपयांच्या दरानें विक्री केली. बुधवारीं एक लक्ष तोळे सोनें विकलें गेलें आणि त्याचा भाव ७२ रुपये करण्यांत आला. किंमतीच्या चढीचा परिणाम सोन्यास जबर मागणी येऊन त्याचा भाव ८० रुपयांपर्यंत वर जाण्यांत झाला. गुरुवारीं बँकेनें टेंडरच्या पद्धतीनें सुमारें एक लाख तोळे सोनें विकले आणि त्याचा भाव ७८ रुपये पडला. गुरुवारीं भाव ८१ रु. १२ आण्यांपर्यंत चढला. ह्या परिस्थितींत सोन्याच्या खरेदीस सट्टेबाजीचें स्वरूप प्राप्त झालें आणि सर्व मोठ्यां शहरांतून व्यापारी लोक सोन्याची मागणी करूं लागले. रिझर्व्ह बँकेंत व इंपीरिअल बँकेंत खरेदीदारांची सारखी झड लागून राहिली. आठवडा अखेर मागणी ओसरली आणि सोन्याचा भाव पुन्हां ७२–७३ रुपयांवर आला. फिनॅन्स सेक्रेटरी मि. जोन्स ह्यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सोनें-चांदीच्या व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांस उद्देशून असें सांगितलें कीं, सोनें बाजारांतली सट्टेबाजी न थांबल्यास तिच्या विरुद्ध सरकारास कडक उपाय योजावे लागतील. त्यासंबंधांत मुंबईच्या बुलियन एक्सचेंजचें असें म्हणणें आहे कीं, रिझर्व्ह बँकेनें सोन्याची किंमत न बदलतां तें ७१ रुपयांनीं विकण्याचा क्रम चालू ठेवला असता आणि त्या भावानें ठराविक तोळे विक्रीस रहाण्याचा आपला निश्चय जाहीर केला असता तर बाजारांत गडबड उडाली नसती. ह्या प्रकारचें धोरण रिझर्व्ह बँकेनें चालू ठेवावें अशी एक्सचेंजची सूचना आहे. कांहीं झालें तरी सामान्य जनतेनें सोन्याच्या सट्टेबाजीपासून दूर रहाणें आवश्यक आहे. भावाच्या चढउतारांचा फायदा घेण्याचा यत्न करणें हा सट्टेवाले आणि व्यापारी ह्यांचा धंदा आहे. त्यांत पडण्यांत सामान्य लोकांचें हित नाहीं.

### झेकोस्लोव्हेकियांत बनविलेली यंत्रसामुग्री

युद्धापूर्वी हिंदुस्थानांत झेकोस्लोव्हेकियामध्यें बनविलेली यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर आयात होत असे. स्कोडा वर्क्सची प्रसिद्धि फार पूर्वीपासून आहे. रेल्वे इंजनें, साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री, टर्बाइन्स, बॉयलर्स, विजेचीं यंत्रें, इत्यादींबद्दल झेकोस्लोव्हेकियाची ख्याति होती. युद्धसमाप्तीनंतर, झेकोस्लोव्हेकियाचीं यंत्रें हिंदुस्थानांत पुनः आयात होऊं लागतील, अशी अपेक्षा आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची मशिनरी झेकोस्लोव्हेकियांतूनच आणलेली आहे व ती बसविण्यासाठी त्यांचाच इंजिनियर आला होता, हें प्रसिद्ध आहे.

### ब्रिटिश कापडाचा धंदा

ब्रिटिश कपास कापडाच्या धंद्याच्या युद्धोत्तर अडचणींचा विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कॉटन बोर्ड कमिटीचा रिपोर्ट त्या धंद्याच्या अडचणींवर प्रकाश पाडतो. लँकेशायरच्या अडचणींचा परिणाम इतर देशांतील धंद्यावर बरा-वाईट होण्याचा संभव असल्याकारणानें रिपोर्टांतील माहिती हिंदुस्थानांतील लोकांना उद्बोधक वाटेल. १९२८–२९ सालीं जगाच्या व्यापारी एकूण मागणीपैकीं ४४% मागणी ग्रेट ब्रिटननें पुरविली, १९३७–३८ मध्यें हें प्रमाण २५%वर घसरलें. ज्या देशांत ब्रिटिश निर्गतीस विशेष सवलती आहेत अशाच ठिकाणीं ब्रिटिश कापड खपूं शकलें. पाव शतकाचे अवधींत ब्रिटिश कापडाचा धंदा तिसऱ्या हिश्यानें बसला. १९३७सालीं ह्या धंद्यांत ४,५९,००० लोक गुंतलेले होते. १९४३ सालीं त्यांची संख्या २,४२,००० वर आली. लँकेशायरचा निर्गत व्यापार प्रतिस्पर्ध्यांच्या हातीं जाऊं देणें भाग पडलें. हिंदुस्थानानें १९३७ सालीं ग्रेट ब्रिटनमधून ३२¾ कोटि चौरस वार कापड घेतलें; १९४२ सालाचा तत्सम आकडा ६० लक्ष चौरस वार असा आहे! जेथें प्रत्यक्ष युद्ध चालू नाहीं अशा ठिकाणीं कापडाचें उत्पादन वाढलें आहे. ग्रेट ब्रिटनमधील उत्पन्न १९३७ चे मानानें १९४२ सालीं निम्में झालें तर अमेरिकेंत व ब्राझीलमध्यें पुष्कळच वाढलें आहे. हिंदुस्थानानें १९३७ सालीं १२ कोटि चौरस वार कापड निर्गत केलें होतें; १९४२ सालीं ९४ कोटि चौरस वार हिंदी कापड परदेशीं गेलें! ब्राझीलची निर्गत ७० लक्ष चौरस वारांची २५ कोटि चौरस वार झाली! कापडाचा धंदा पूर्वस्थितीस येण्यास कित्येक वर्षें लागतील. वरील माहितीवरून लँकेशायरचे गिरणीवाले युद्धोत्तर काळांत आपलें बस्तान पुन: बसविण्याची शिकस्त कां करतील, हें लक्षांत येईल.

---

### सुरत सें. को. बँकेच्या मांडवी शाखेचें उद्घाटन

सुरत जिल्हा को. बँक लि. च्या मांडवी शाखेचें उद्घाटन २५ मार्च रोजीं श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., ह्यांच्या हस्तें झालें. बँकेचे चेअरमन, दि. ब. गांधी, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत नव्या शाखेसंबंधी अपेक्षा समजावून सांगितल्यानंतर श्री. सरय्या ह्यांनीं भाषण केलें. ते म्हणाले, "सुरत जिल्हा बँकेचा संबंद प्रांतांतील उत्कृष्ट बँकांत अत्यंत वरचा नंबर लागतो. तिचेजवळ शिलकी पैसा मुबलक आहे, परंतु तो सहकारी कामांत तिला गुंतवितां येणें अशक्य झालें आहे. तालुक्यांतील मागासलेल्या जातींच्या उद्धारासाठी मांडवी शाखेमार्फत बँकेच्या पैशाचा विनियोग व्हावा असें मला वाटतें." सेल आणि परचेस युनियन व बँक ह्यांचे सहकार्यानें लोकांच्या उद्धारास सहकारी चळवळीचे द्वारां उत्तेजन कसें मिळूं शकेल, हेंहि त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें.

---

### औंध म्यूच्युअल लाइफ अॅ. सोसायटी लि. पुणें

वरील म्यूच्युअल विमा कंपनीनें १९४३ मध्यें ३,८५,४५३ रुपयांच्या विम्याचें काम पुरें केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ११०% वाढ दाखवितो. आयुर्विमा निधींत ११,६४६ हजारांची भर पडून तो २९,०७० रुपये झाला आहे. कंपनी स्थापन झाल्यापासून १९४३ अखेर तीन वर्षांत तिचेकडे एकहि क्लेम आलेला नाहीं, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. मेसर्स आर. आर. नावर आणि कं. चे प्रोप्रायटर श्री. वा. पुं. वर्दे हे कंपनीचे चेअरमन असून श्री. वि. गो. जोशी हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
| --- | --- | --- |
| रु. १०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ४,९६,१७० |

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I., B.
मॅनेजर

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यावर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कधींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

## मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट.

**पेन्टर. बेडेकर, ए. जी.,**

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

---

प्रगतिपथावरील नवा

# मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११२ टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट • व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

---

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय्.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स:**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

---

# पैसाच पैसा !



बालकांनो ! बालिकांनो !

## नेमका नेम मारा

व " धनुर्धारी " कॉंपिटिशनमधील बक्षिसें मिळवा

रोख १६० रुपयांचीं वीस बक्षिसें

विशेष माहिती श्रीकृष्णचे मॅनेजरांचे कचेरींत दररोज ४ ते ६ मिळेल.

## २३ वा आठवडा !

'प्रकाश' पिक्चर्सचा मराठी बोलपट

# रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट

भूमिका:—शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

**श्रीकृष्ण, पुणें** दररोज ३ खेळ ३—६॥ व १० वा.

— एव्हरग्रीन प्रकाशन —

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.